# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.04.2026** **वारः शनिवार**

---

1. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या विलिनीकरणाचा कुठलाही मुद्दा सरकारच्या विचाराधीन नाही - केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं स्पष्टीकरण
2. देशात खतांचा पुरेसा साठा असल्याचा केंद्र सरकारचा पुनरुच्चार
3. किमान हमी भावानं गहू खरेदीच्या मर्यादेत 15 टक्क्यांनी वाढ करण्याचा सरकारचा निर्णय आणि
4. इजिप्तमध्ये सुरू असलेल्या कनिष्ठ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत, भारतीय नेमबाजांचं वर्चस्व कायम

**<u>निर्मला सीतारामन</u>**

सार्वजनिक क्षेत्रातल्या इतर बँकांच्या विलिनीकरणाचा कुठलाही मुद्दा सरकारच्या विचाराधीन नाही, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्ट केलं आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या महाराष्ट्र प्रदेश स्थानिक मुख्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी त्या काल पुण्यात बोलत होत्या. बँकांनी विस्तार करताना ग्राहकांशी चांगला संपर्क ठेवणं महत्त्वाचं असून व्यवहारातील माणुसकी हरवणार नाही याचीही काळजी घ्यायला हवी असा सल्ला सीतारामन यांनी यावेळी दिला. सध्या जागतिक परिस्थिती थोडी अवघड असल्यानं निर्यातीला फटका बसत असला तरी आपले निर्यातदार नवीन बाजारपेठ शोधून काम सुरू ठेवत आहेत, हे खूप कौतुकास्पद आहे असं सीतारामन म्हणाल्या. या कार्यक्रमाला खासदार मेधा कुलकर्णी, अर्थ मंत्रालयाचे सचिव एम. नागराजू, आणि स्टेट बँक ऑफ इंडियाचे अध्यक्ष चल्ला श्रीनिवासुलु शेट्टी उपस्थित होते. यावेळी सीतारामन यांच्या हस्ते 'स्टेट बँक ऑफ इंडिया'च्या या नवीन इमारतीची प्रतिमा असलेलं टपाल तिकीट प्रकाशित करण्यात आलं.

**<u>सरकार-खतं</u>**

देशात खतांचा पुरेसा आणि स्थिर साठा असून, सर्व प्रकारच्या प्रमुख खतांच्या उपलब्धतेत सातत्यानं वाढ होत असल्याचं सरकारनं काल पुन्हा एकदा स्पष्ट केलं. गेल्या काही दिवसात खतांचा तुटवडा असल्याचे दावे केले जात होते, ते वस्तुस्थितीला धरून नाहीत, असं केंद्रीय रसायनं आणि खतं विभागानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. नुकत्याच संपलेल्या 2025-26 च्या रब्बी हंगामातील तसंच सध्याच्या काळातील आकडेवारी पाहिल्यास संपूर्ण देशभर खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असून काही अडथळा निर्माण झाल्यास त्याला तोंड देता येऊ शकेल अशी पुरवठ्याची स्थिती असल्याचंही मंत्रालयानं या निवेदनाद्वारे म्हंटलं आहे. या वर्षीच्या मार्चमध्ये संपलेल्या रबी हंगामाच्या आकडेवारीनुसार खतांची उपलब्धता गरजेपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक होती. पुरवठ्याची ही स्थिती वर्तमान आर्थिक वर्षातही समाधानकारक राहिली आहे.

**<u>नड्डा-खंडन</u>**

दरम्यान केंद्रीय रसायनं आणि खतं विभागाचे मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी देशात खतांचा तुटवडा असल्याचा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा आरोप फेटाळला आहे. खर्गे यांचा हा आरोप राजकीय हेतूंनी प्रेरित असून शेतकरी आणि उत्पादकांमध्ये अकारण भय निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे, असं नड्डा यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. केंद्र सरकार कायमच शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असून देशभर खतांची उपलब्धता सातत्यानं गरजेपेक्षा जास्त राहिली आहे, असंही त्यांनी नमूद केलं आहे.

**<u>गहू एमएसपी</u>**

केंद्र सरकारनं सध्याच्या हंगामासाठी किमान हमी भावानं गहू खरेदी करण्याचं आपलं लक्ष्य 15 टक्क्यांनी वाढवून साडेचौतीस दशलक्ष टन खरेदीचं उद्दीष्ट निर्धारित केलं आहे. यापूर्वी सरकारनं तीस दशलक्ष टन गहू खरेदीचं उद्दीष्ट ठरवलं होतं. अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याच्या उद्देशानं हा निर्णय घेण्यात आला असल्याचं अन्न सचिव संजीव चोप्रा यांनी सांगितलं.

राज्यनिहाय गहू खरेदीचं लक्ष्यही वाढवण्यात आलं आहे, असंही चोप्रा यांनी काल नवी दिल्लीत आटा उत्पादक महासंघाच्या वार्षिक गहू सर्वेक्षण अहवालाच्या प्रकाशनप्रसंगी सांगितलं.

**पेटीएम-कारवाई**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं पेटीएम पेमेंट्स बँकेचा बँकिंग परवाना रद्द केला आहे. या बँकेला कोणताही व्यवसाय करण्यास तत्काळ प्रभावानं बंदी घालण्यात आली असल्याचं रिझर्व बँकेच्या निवेदनात म्हटलं आहे. तथापि पेटीएम बँकेला तिचं कामकाज पूर्णपणे संपवताना सर्व आर्थिक देणी चुकती करता यावीत यासाठी बँकेकडे पुरेशी रोख तरलता असल्याचंही रिझर्व बँकेनं स्पष्ट केलं आहे.

**अराघची-पाकिस्तान दौरा**

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची काल रात्री उशिरा एका शिष्टमंडळासह पाकिस्तानातील इस्लामाबाद इथं दाखल झाले. त्यामुळं पश्चिम आशियातील युद्ध संपवण्यासाठी तेहरान आणि वॉशिंग्टन यांच्यातील रखडलेल्या वाटाघाटींना पुन्हा चालना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इराणी शिष्टमंडळात इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाकाई यांचा समावेश आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात कोणतीही बैठक नियोजित नसून, त्याऐवजी तेहरानची मते आणि चिंता पाकिस्तानमार्फत वॉशिंग्टनपर्यंत पोहोचवल्या जातील, असं बाकाई यांनी समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये म्हंटलं आहे. अमेरिकादेखील राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याची तयारी करत असून, अमेरिकेचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर चर्चेसाठी इस्लामाबादमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचं व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या  कॅरोलाइन लिव्हिट यांनी सांगितलं. दरम्यान जोपर्यंत करार होत नाही, तोपर्यंत अमेरिकन सैन्य इराणी बंदरांवर नाकेबंदी सुरूच ठेवेल असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हंटलं आहे.

**ब्रिक्स-MENA**

'ब्रिक्स'च्या उप-परराष्ट्र मंत्र्यांची आणि मध्य-पूर्व आणि उत्तर आफ्रिकेसाठीच्या विशेष दूतांची बैठक नुकतीच भारताच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत सध्याच्या प्रादेशिक घडामोडींवर विचारविनिमय करण्यात आला. नवी दिल्ली इथं आयोजित या बैठकीचं अध्यक्षपद वरिष्ठ सचिव डॉ. नीना मल्होत्रा यांनी भूषवल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाज माध्यमावरील एका पोस्टद्वारे सांगितलं.

**आप-खासदार**

आम आदमी पक्षाच्या राज्यसभेतल्या 10 पैकी 7 खासदारांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. खासदार राघव चड्ढा यांनी काल नवी दिल्लीत झालेल्या वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. चढ्ढा यांच्यासह संदीप पाठक, अशोक मित्तल, हरभजन सिंग, स्वाती मालीवाल, विक्रम सहानी आणि राजिंदर गुप्ता यांचा यात समावेश आहे. आप मूळ विचारांपासून दूर गेला असल्यानं आपण हा निर्णय घेतल्याचं चढ्ढा यांनी सांगितलं.

**पश्चिम बंगाल-मोदी**

पश्चिम बंगाल मध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी विविध राजकीय पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू आहे. पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल दक्षिण 24 परगणा जिल्ह्यातील बारुईपूर इथं एका निवडणूक सभेला संबोधित केलं. पश्चिम बंगालमध्ये परिवर्तन अटळ असल्याचं सांगून, पहिल्या टप्प्यातील मतदानाचा कल पाहता, अनेक जिल्ह्यांमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसणार असल्याचा दावा मोदी यांनी केला.

**पश्चिम बंगाल-ममता बॅनर्जी**

तर तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी हावडा इथं एका निवडणूक सभेला संबोधित करताना भाजपला मागील निवडणुकीच्या तुलनेत यावेळी निम्म्यापेक्षाही कमी जागा मिळतील असा
दावा केला.

**जनगणना-हेल्पलाइन**

'जनगणना 2027' साठी राष्ट्रीय टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांक 1-8-5-5 आता सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कार्यान्वित झाला असल्याचं रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त कार्यालयानं जाहीर केलं आहे. नागरिकांचा सहभाग सुलभ करणं,

प्रक्रियेत स्पष्टता आणणं आणि या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय उपक्रमात नागरिकांना प्रभावीपणे योगदान देण्यासाठी साहाय्य करणं हा या सेवेचा उद्देश आहे.

**आकाशवाणी-स्पर्धा**

आकाशवाणी, प्रसार भारतीने 'माय जीओव्ही'च्या सहकार्याने देशभरातील नागरिकांना 'आकाशवाणी @90-भारताची नवी लय' या संकल्पनेवर आधारित संकेतधून तयार करण्याच्या स्पर्धेत तसंच 'आकाशवाणी @90-भारताचा चैतन्यमय आवाज' या संकल्पनेवर आधारित जिंगल-निर्मिती स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नागरिकांना आमंत्रित केले आहे. स्पर्धेतील संगीत रचनांसाठी विविध निकष तसंच पारितोषिकं जाहीर केली आहेत.

**गोदा-नर्मदा जलयात्रा-नाशिक**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300व्या जन्मशताब्दीचं औचित्य साधून आजपासून 29 एप्रिलपर्यंत गोदावरी ते नर्मदा जलयात्रा काढली जाणार आहे. त्र्यंबकेश्वरमधून आज सकाळी नऊ वाजता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जलयात्रेचा प्रारंभ होईल अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. जलसंवर्धनाबाबत जनजागृती, लोकसहभाग आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाची संकल्पना अधिक बळकट करणं, हा जलयात्रेचा मुख्य उद्देश असल्याचं त्यांनी सांगितलं. त्र्यंबकेश्वरबरोबरच अहिल्यादेवींचे जन्मस्थान श्रीक्षेत्र चौंडी इथल्या कार्यक्रमाचा प्रारंभ आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे. चौंडी इथून निघणारी तसंच त्र्यंबकेश्वमधून निघणारी यात्रा उद्या शिर्डीत एकत्र येईल आणि त्यानंतर एकत्रितपणे पुढे मार्गस्थ होईल. 29 एप्रिल रोजी मध्य प्रदेशातील महेश्वर इथं या जलयात्रेचा समारोप होणार आहे.

**नेमबाजी**

इजिप्तममध्ये कैरो इथं सुरू असलेल्या कनिष्ठ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत, भारतीय नेमबाजांनी काल सुवर्णपदक जिंकत आपलं वर्चस्व कायम राखलं. 10 मीटर एअर रायफल मिश्र सांघिक प्रकारात, शाम्भवी श्रवण क्षीरसागर आणि दिव्यांशू शैलेंद्र देवांगन यांनी सुवर्णपदकावर नाव कोरलं. चार सुवर्ण, पाच रौप्य आणि तीन कांस्य पदकांसह भारत सध्या पदकतालिकेत अव्वल स्थानी आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.
# नमस्कार.